# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईवर समुद्र मार्गे होत असलेले अतिरेकी हल्ले रोखण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या स्पीड बोटी वापराविना असल्याबाबत**

**(१) ६६ (२४-१२-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर समुद्र मार्गे होत असलेले अतिरेकी हल्ले रोखण्याकरिता ३२ कोटी रुपये खर्च करुन खरेदी करण्यात आलेल्या स्पीड बोटी वापराविना असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्पीड बोटींचा वापर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही, बृहन्मुंबई पोलीस दलाचे आस्थापनेवर केंद्र शासनामार्फत, गोवा शिपयार्ड या कंपनीकडून प्राप्त झालेल्या ४ स्पीड बोटी व राज्यशासनाने मरीन फ्रन्टियर्स कंपनीकडून प्राप्त झालेल्या १० स्पीड बोटी अशा १४ स्पीड बोटी व ०६ जुन्या फायबर बोटी अशा एकूण २० बोटी आहेत. गोवा शिपयार्ड कंपनीकडून प्राप्त झालेल्या ४ स्पीड बोटींच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबतचा सेवाकरार दिनांक ३१.०३.२०१६ पर्यंत झालेला आहे. तसेच मरीन फ्रन्टियर्स कंपनीकडून प्राप्त झालेल्या १० स्पीड बोटींच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबतचा सेवाकरार गोवा शिपयार्ड लि. यांचेसोबत शासन निर्णय क्रमांक एमटीएस-०३१३/प्र.क्र.७१८/पोल-४, मुंबई, दिनांक ०१ जुलै, २०१४ अन्वये झालेला आहे. ऑक्टोबर, २०१४ मध्ये २ स्पीड बोटी व ०५ फायबर बोटी कार्यरत होत्या व गोवा शिपयार्डकडील ३ स्पीड बोटींचे दुरुस्तीचे काम चालू होते. सध्या गोवा शिपयार्डकडील चारही स्पीड बोटी कार्यरत असून फेन्टीयर्स कंपनीकडील ०४ स्पीड बोटी कार्यरत आहेत.

(२) वरीलप्रमाणे बोट निर्मितीदारासोबत शासनाने दुरुस्तीचा सेवाकरार केला असून बोटी जशा बंद पडता त्या संबंधितांकडून दुरुस्ती करुन घेण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे अधिपत्याखाली विदर्भातील ७ जिल्हा ग्रंथालय अधिकारी वर्ग-२ या पदाच्या प्रस्तावाबाबत**

**(२) १३७३ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ. मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे अधिपत्याखाली विदर्भातील ७ जिल्हा ग्रंथालय अधिकारी वर्ग-२ या पदाचा प्रस्ताव दिनांक २५ नोव्हेबर, २०१३ ला सादर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, प्रस्ताव मंजूर करण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०९-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक आस्थापनेमध्ये ८० टक्के स्थानिक उमेदवारांची नोकरभरती करणेबाबत**

**(३) १३८७ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक आस्थापनेमध्ये ८० टक्के स्थानिक उमेदवारांची नोकरभरती झाली नसल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक आस्थापनाने स्थानिकांना रोजगार न दिल्यास त्यावर नियंत्रण व पर्यवेक्षण तथा कार्यवाही करण्याची जबाबदारी कोणत्या विभागाकडे दिलेली आहे काय,

(३) असल्यास, परप्रांतीयांना राज्यात नोकरी देतांना महसूल विभागाकडून अधिवास प्रमाणपत्र आवश्यक असतांना स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना नोकरीत समाविष्ट करण्यात आले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक बेरोजगार उमेदवारांवर झालेला अन्यायाबाबत तसेच त्यांना नोकरीत समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२५-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यामध्ये एकूण २१७ मोठे औद्योगिक उपक्रम असून, त्यामध्ये एकूण ४५,७४५ लोकांना रोजगार उपलब्ध झाला असून त्यामध्ये स्थानिक लोकांचे प्रमाण ८९ टक्के आहे. तसेच एकूण १३,६०० सुक्ष्म, लघु व मध्यम औद्योगिक उपक्रम असून त्यामध्ये एकूण १,३०,००० लोकांना रोजगार उपलब्ध झाला असून त्यात स्थानिक लोकांचे प्रमाण ९२ टक्के आहे.

(२) सदर धोरणाची अंमलबजावणी उद्योग विभागामार्फत केली जाते.

(३) नाही, तथापि, दिनांक १७/११/२००८ च्या शासन निर्णयानुसार औद्योगिक उपक्रमांनी कर्मचारी स्थानिक असल्याबाबत पुरावा जसे अधिवास प्रमाणपत्र किंवा जातीचे प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला या सारखे कागदपत्र त्यांचे अभिलेखावर ठेवून ते तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पूर्वेकडील गावांना जोडणा-या राजापूर-अणुस्कुरा रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या मागणीबाबत

**(४) १४०५ (२२-१२-२०१४). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पूर्वेकडील गावांना जोडणा-या राजापूर- अणुस्कुरा रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी येथील जनतेने संबंधित विभागाकडे नुकतीच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ता वारंवार खराब होत असल्याने खड्डे बुजविण्याचे काम हाती घेऊन जनतेची फसवणुक करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(४) तद्नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०४-२०१४) :** (१) नाही.

(२) व (३) सदर रस्त्यावर अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे भरण्याचे काम प्रगतीपथावर असून सद्य स्थितीत वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे-ढोलगाव-सावंगी (जि.हिंगोली, ता.वसमतनगर) येथील**
**पूर्णा नदीवरील बंधा-याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(५) १४२४ (२२-१२-२०१४). श्री. जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-ढोलगाव-सावंगी (जि.हिंगोली, ता.वसमतनगर) येथील पूर्णा नदीवरील बंधा-याचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपूर्णावस्थेतील कामास प्राधान्यक्रम देऊन किती कालावधीत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याच्या संकल्पचित्रात बदल झाल्यामुळे तसेच योजनेच्या किंमतीत वाढ झाल्याने सुधारित अंदाजपत्रकास मान्यतेनंतर कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांचे उर्वरित काम पूर्ण करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रक मंजूरी नंतर एका वर्षामध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

(३) सुधारित अंदाजपत्रक तयार करणेस काही कालावधी अपेक्षित असल्याने विलंब होत आहे.

---

**राज्यातील खाजगी प्रवासी बसेस तसेच स्लीपर कोच गाड्यांना**
**आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचे मार्ग नसल्याबाबत**

**(६) १४४१ (१५-०१-२०१५). श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी प्रवासी बसेस तसेच स्लीपर कोच गाड्यांना आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचे मार्ग (दरवाजा) नाहीत त्यांच्याकडून वाहतूक नियमांचे पालन होत नसेल तर त्यांच्यावर तातडीने कारवाई करुन त्या बंद करा अन्यथा बसेसची दुर्घटना झाल्यास बस चालकमालक, आरटीओ अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असा आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास आरटीओ अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये कोणाती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते (०६-०४-२०१५) :** (१) जनहित याचिका क्र.२८/२०१३ मध्ये मा.उच्च न्यायलयाने ज्या प्रवासी बसेसना सहज उघडता येणारा आपत्कालिन मार्ग (दरवाजा) नसेल अशा बस चालकांविरुध्द कारवाई करणेबाबत तसेच विहित मानकांची पुर्तता न करता अशा बसेस चालू दिल्यास संबंधित अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात येईल असे दिनांक

१०.६.२०१४ रोजी आदेशित केले होते. तसेच दिनांक १४.१०.२०१४ रोजीच्या आदेशात स्लीपर तसेच प्रवासी बसेसची तपासणी करण्याचे आदेश दिले होते.

(२) या अनुषंगाने माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये स्लीपर तसेच प्रवासी बस तपासणीची विशेष मोहिम राबविण्यात आली होती. या मोहिमेत करण्यात आलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे.

| तपासलेली वाहने | दोषी वाहने | जप्त केलेली वाहने | सीएफसी दिलेली वाहने | तडजोड शुल्क (अ) | कर वसूली (ब) | एकूण वसूली (क) |
|---|---|---|---|---|---|---|
| ८८८७ | १९८४ | १८३ | ४४ | ३१,९०,५६१/- | १,६५,५९,५८१/- | १,९७,५०,१४२/- |

दोषी वाहनांविरुध्द मोटार वाहन कायदा, १९८८ कलम ५३, ५४, व कलम ५५ मधील तरतुदीनुसार वाहनांची नोंदणी निलंबन करणे/रद्द करणे तसेच कलम -५६ मधील तरतुदीनुसार परिवहन वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र रद्द करणे, अशा कडक कारवाईबाबत क्षेत्रीय अधिका-यांना सूचना देण्यात आलेल्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.ठाणे) तालुक्याच्या बंदरपट्टीतील चिंचणीसह २५ गावात असलेल्या डायमेकिंगच्या व्यवसायाला भारनियमन कमी करण्याबाबत

**(७) १४४२ (२२-१२-२०१४). श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.ठाणे) तालुक्याच्या बंदरपट्टीतील चिंचणीसह समुद्रकिनाऱ्याजवळ वसलेल्या २५ गावात जगप्रसिध्द असलेल्या डायमेकिंगच्या व्यवसायाला शासनाकडून कोणत्याच सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येत नाहीत तसेच अनेक वर्षापासून बंदरपट्टी भागात रात्रंदिवस प्रचंड वीजभारनियमन सुरु असल्याने या व्यावसायीकांवर उपासमारीचे संकट ओढावले असल्यामुळे भारनियमन कमी करण्यासाठी येथील व्यवसायीकांनी बोईसर, पालघर येथील वीज मंडळाचे अभियंते, कार्यकारी अभियंते यांना वारंवार लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डायमेकिंग व्यवसायात ३० हजारापेक्षा जास्त लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन असल्याने तसेच उच्च शिक्षण घेऊन शासनाच्या नोकरीवर अवलंबून न राहता डायमेंकिंग व्यवसायाकडे वळलेल्या उच्च शिक्षितांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळू नये यासाठी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे, डहाणू (जि.ठाणे) तालुक्याच्या बंदरपट्टी भागात प्रचंड वीज भारनियमन सुरू नसून सदर परिसरात विज भारनियमन कमी करण्यासाठी व्यवसायीकांनी बोईसर व पालघर येथे निवेदने दिलेली आहेत.

(२) डहाणू तालुक्याच्या बंदरपट्टीतील चिंचणीसह समुद्रकिना-याजवळ वसलेल्या ज्या गांवामध्ये डायमेकिंग व्यवसाय सुरू आहे त्या परिसरातील वीज भारनियमन कमी करण्याकरीता वितरण कंपनीमार्फत सदर परिसरातील वीज चोरीविरुध्द धडक मोहिम उघडण्यास येऊन ११ केव्ही चिंचणी वाहिनीवरील सदर परिसर नियमित भारनियमनातून मुक्त केलेला आहे. तसेच ११ केव्ही वरोर वाहिनीवरील परिसरातील भारनियमन सुमारे २.१५ तासाने कमी झालेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र व्यवस्थापन आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्काबाबत

**(८) १४५९ (२२-१२-२०१४). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र व्यवस्थापन आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्काबाबत असलेल्या संभ्रमाची स्थिती दूर करुन शुल्क रचनेबाबत समान सुत्रांवर आधारीत नियमावली तयार करण्याचे एआयसीटीई स्तरावर सुरु असलेले काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०४-२०१५) :** (१) व (२) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई) ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील वैधानिक परिषद आहे. सदर परिषदेवर राज्य शासनाचे नियंत्रण नसते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आरोग्य विज्ञान विद्यापीठाने २२ नविन महाविद्यालयांच्या प्रस्तावांना मान्यता दिल्याबाबत

**(९) १४७२ (२२-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील वर्षाचे वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित असताना आरोग्य विज्ञान विद्यापीठाने २२ नविन महाविद्यालयांच्या प्रस्तावांना मान्यता दिली असल्याचे दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रलंबित असलेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर प्रस्तावाना मान्यता देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शेती फीडरवरील शेतकऱ्यांना दिवसभरातून फक्त सहा तास वीज मिळत असल्याबाबत**

**(१०) १५०५ (१५-०१-२०१५). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेती फीडरवरील शेतकऱ्यांना सलग बारा तास वीज देण्याबाबत महावितरण कंपनीने मान्य केले आहे, परंतु कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रत्यक्षात दिवसभरातून फक्त सहा तास वीज मिळते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वीजेच्या भारनियमनामुळे शेतकऱ्यांच्या ऊस पीक वाढीवर परीणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांना सलग १२ तास वीज देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) नाही.
(२) खरे नाही. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व दिवसा ८ तास ३ फेज विजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील २३ रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांवर उपचाराबाबत**

**(११) १५१७ (२३-१२-२०१४). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री. जयदत्त क्षीरसागर (बीड), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील २३ रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांवर उपचार केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या माध्यमातून आजपर्यंत १२८०० रुग्णांवर उपचार करणेत आले आहेत व उपचाराकरिता ३३ कोटी रुपये आवश्यक आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रकमेपैकी फक्त २२ कोटी रुपये या रुग्णालयांना शासनाकडून मिळाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयांना उर्वरीत १० कोटी रुपयांची रक्कम न मिळाल्यामुळे सदर रुग्णालयामध्ये नव्याने दाखल होणाऱ्या रुग्णांना दाखल करुन घेण्यास स्पष्ट नकार दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रुग्णांना सुरळीत सुविधा मिळविण्यासाठी शासन संबंधीत रुग्णालयांना उर्वरित १० कोटी रुपये तात्काळ अदा करणार आहे का, व भविष्यामध्ये रुग्णालयांकडे वेळेत निधी वर्ग करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणार आहे का ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१५) :** (१) नाही, कोल्हापूर जिल्ह्यातील १ शासकीय व २७ खाजगी अशा एकूण २८ रुग्णालयांचा समावेश राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये करण्यात आला आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये योजनेंतर्गत १३८२९ रुग्णांवर शस्त्रक्रिया/उपचार करण्यात आले असून त्याची रक्कम रु.३९.३९ कोटी इतकी आहे.

(३) नाही. सदर योजनेंतर्गत दावे शासनाकडून अदा करण्यात येत नसून विमा कंपनीकडून आद केले जातात. त्यानुसार अंगीकृत रुग्णालयांची विमा कंपनीकडे रु.३६.३७ कोटीचे दावे सादर केले असून त्यापैकी कंपनीने रु.२९.८८ कोटीचे दावे अदा केले आहेत.

(४) नाही. योजनेंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील अंगीकृत रुग्णालयाची रु. १.४८ कोटी एवढ्या रकमेचे दावे विमा कंपनीकडून प्रलंबित आहेत. तथापि या कारणामुळे अंगीकृत रुग्णालयाकडून कोणत्याही रुग्णांना दाखल करुन घेण्यास नकार दिलेला नाही.

(५) सदर योजनेंतर्गत दावे शासनाकडून अदा करण्यात येत नाही तर कंपनी व रुग्णालये यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील तरतूदीनुसार विमा कंपनीकडून रुगणालयांना दावे अदा केले जातात. त्यानुसार रुग्णालयांनी दाव्यासोबत आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची ऑनलाईन पूर्तता केल्यानंतर १५ कार्यालयीन दिवसात अदा करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

---

**मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागात होणाऱ्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर 'एमकेसीएल' या कंपनीची सेवा बंद करण्याचा घेण्यात येणाऱ्या निर्णयाबाबत**

**(१२) १५३५ (२२-१२-२०१४). श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागात होणाऱ्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर परिक्षांसह अन्य प्रक्रियेसाठी सॉफ्टवेअर सेवा पुरवणाऱ्या 'एमकेसीएल' या कंपनीची सेवा बंद करण्याचा निर्णय पुढील शैक्षणिक वर्षापासून घेण्यात येणार असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, नवीन कंपनीच्या नेमणूकीबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील नक्षलग्रस्त पेरमिली पोलीस ठाण्यात पोलीस आणि सीआरपीएफ जवानांमध्ये मारहाणीची घटना घडल्याबाबत**

**(१३) १५३८ (१५-०१-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील नक्षलग्रस्त पेरमिली पोलीस ठाण्यात पोलीस आणि सीआरपीएफ जवानांमध्ये मारहाणीची घटना माहे ऑक्टोबर, २०१४ दरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तणावामुळे पेरमिली परिसरात नक्षलविरोधी अभियान बंद आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, पोलीस व सीआरपीएफ यांच्यामध्ये समन्वय साधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) जिल्हा पोलीस अधिकारी /कर्मचारी व सीआरपीएफ चे अधिकारी/ कर्मचारी यांचेसोबत दिनांक १७.१०.२०१४ रोजी उप पोलीस ठाणे, पेरमिली येथे बैठक घेऊन समन्वय साधण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वीजेच्या पुरवठयासाठी महावितरणाची ४१२ नवी उपकेंद्रे उभारण्याबाबत**

**(१४) १५६४ (१५-०१-२०१५). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाढता विजेचा वापर यामुळे जुन्या साधनावर होत असलेला भार यांचे निर्मुलन करण्यासाठी महावितरणाच्या वतीने राज्यात ३२ केव्हीचे ४१२ नवीन सबस्टेशन उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात यापैकी किती उपकेंद्र उभारण्यात येणार आहे,
(३) सदर उपकेंद्र केव्हा कार्यान्वित होणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय, पायाभूत सुविधा आराखडा - २ अंतर्गत महावितरण कंपनीद्वारे राज्यात एकूण ६०६ नविन ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारण्यात येणार आहेत.
(२) विदर्भात पायाभूत सुविधा आराखडा - २ अंतर्गत विभागाच्या ११ जिल्ह्यामध्ये एकूण ७९ नविन उपकेंद्र उभारण्यात येणार आहेत.
(३) पायाभूत सुविधा आराखडा - २ अंतर्गत विभागावर कामाचे कंत्राट ई-टेंडरीगंच्या माध्यमातून कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेले असून कामाचा कालावधी २ वर्षाचा आहे व कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्य घोषित झाल्याने जंगलाच्या बाजूच्या गावातील जनावरांचे चराई क्षेत्र घटल्याबाबत**

**(१५) १५७८ (२२-१२-२०१४). डॉ. पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्य घोषीत झाल्याने जंगलाच्या आजूबाजूच्या गावातील जनावरांचे चराई क्षेत्र घटले असून तर काही ठिकाणी चराई क्षेत्रच नाही त्यातही काही गावांना दिलेले चराई क्षेत्र गावापासून ९ ते १० कि.मी अंतरावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावाकरिता चराई क्षेत्र गावापासून २ कि.मी. चे आत परीघ क्षेत्रात उपलब्ध करुन जनावरांचा चराई क्षेत्राचा प्रश्न सोडविण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, शासन स्तरावर हयाबाबतीत काय उपाययोजना केल्या वा करण्यात येणार आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०१५) :** (१) व (२) नवीन बोर अभयारण्य घोषित झाल्याने चराईचे क्षेत्र घटले आहे, तथापि बोर अभयारण्या लगतच्या १६ गावांना गावापासून ३ ते ४ कि.मी. अंतरावर चराई क्षेत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

आमगाव जंगली व मरकसूर या गावाकरता मंजूर कार्य आयोजनेनुसार एकही कक्ष उपलब्ध नसल्याने व नवरगाव हे गाव बोर अभयारण्यात संपूर्ण हस्तांतरीत असल्याने चराई क्षेत्र उपलब्ध करुन देणे शक्य नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगाव-मळे (ता.कोपरगांव जि.अहमदनगर) येथे**
**३३ KV सब स्टेशन काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) १५८९ (१५-०१-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव - मळे (ता. कोपरगांव जि. अहमदनगर) येथे ३३ KV सब स्टेशनचे प्रलंबित असलेले काम तसेच वैजापूर १३२KV पासून वीज लाईन टाकणेस मंजुरी अदयापपर्यंत मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) याबाबत शासनाने निधी उपलब्ध करुन सदर प्रलंबित कामे पुर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) तळेगांव-मळे हया उपकेंद्रासाठी लागणारी ३३ के.व्ही. वाहिनी ही १३२ के.व्ही. कोपरगांव उपकेंद्रातून प्रस्तावीत करण्यात आलेली होती. परंतु कोपरगांव येथून ३३ के.व्ही. विज वाहिनी टाकण्याकरीता रेल्वे क्रॉसींग, शहरी भाग इत्यादी अडचणीमुळे जवळच्या वैजापूर १३२ के.व्ही. उपकेंद्रातून ३३ के.व्ही. वाहिनी जोडण्यात येणार आहे. त्यास महापारेषण कंपनीने परवानगी दिलेली आहे.

(३) पायाभूत आराखडा - २ अंतर्गत संगमनेर विभागासाठी टेंडर टी - ३५ हे रु.९३.५७ कोटीचे काढण्यात आले असून महापारेषण कंपनीने १३२ के.व्ही. वैजापूर उपकेंद्रातून ३३ के.व्ही. वाहीनी टाकण्यासाठी परवानगी दिली असल्यामुळे तळेगांव-मळे येथील उपकेंद्राची कामे तातडीने पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जेष्ठ नागरीकांसाठी नवीन धोरण लागू करण्याबाबत**

**(१७) १६०९ (२२-१२-२०१४). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री. संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री. योगेश सागर (चारकोप), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जेष्ठ नागरीकांसाठी नवीन धोरण लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावार शासनाने निर्णय घेतला आहे काय, तसेच प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) सदर प्रस्तावावर शासनाने अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०३-२०१५) :** (१), (२) व (३) राज्याच्या सर्वसमावेशक जेष्ठ नागरिक धोरणास दिनांक ३०-९-२०१३ रोजी मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून याप्रकरणी जेष्ठ नागरिकांसंबंधी राबवावयाच्या योजनाबाबत सर्व संबंधित विभागांकडून तपशिल व आर्थिक भारासंबंधीची माहिती देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

---

**राज्याचे जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख संचालकांनी त्यांच्या मोजणीदरामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात**

**(१८) १६१३ (२२-१२-२०१४). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख संचालकांनी त्यांच्या मोजणीदरामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात दिनांक ६ फेब्रुवारी, २०१० रोजी आणि १ डिसेंबर, २०१२ रोजी परिपत्रक जारी केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिपत्रकानुसार पालिका हद्दीतील क्षेत्र मोजणीसाठी दर हेक्टरी शुल्क न आकारता चौरस मीटरनुसार आकारणी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे भूमापन मोजणीदरात भरमसाठ वाढ झाल्याने येत्या तीन महिन्यात वरील परिपत्रके रद्द करावी असा निर्णय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०४-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी एका रिट याचिकेत जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे यांनी दिनांक ३०.०१.२०१४ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी दिनांक ०१.१२.२०१० रोजी पारित केलेल्या मोजणी शुल्क आकरण्यासंबंधीचा दुरुस्ती आदेश रद्द करण्यासाठी शासनास सादर केलेल्या प्रस्तावावर ३ महिन्याच्या आंत निर्णय घेण्याबाबत निर्देशित केले होते. त्यानुषंगाने शासनाने जमाबंदी आयुक्त यांना उक्त आदेशाचे पुनर्विलोकन करुन उचित आदेश पारित करण्यास दिनांक २७.०१.२०१५ च्या पत्रान्वये मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी दिनांक ०३.०२.२०१५ च्या आदेश अन्वये दिनांक ०१.१२.२०१० चे दुरुस्ती आदेश रद्द केले आहेत.

---

**राज्यातील विशेषतः शहरात वाहतूकीच्या नियमांचे पालन होत नसल्याबाबत**

**(१९) १६२४ (१५-०१-२०१५). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः शहरात वाहतूकीच्या नियमांचे पालन होत नाही, रस्त्यावरील सिग्नल बंद असणे व झेब्रा कॉसिंगचे पट्टे नसल्याने गाड्या सिग्नल तोडून जातात पोलीस त्यांच्यावर कारवाई करित नाही त्यामुळे रस्ता ओलांडताना सर्वसामान्य नागरिकांना कसरत करावी लागते व त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढते यासाठी राज्य सरकारला मा.उच्च न्यायालयाने वाहतूक पोलीस शिपायाला वाहतूकीच्या नियमांचे उल्लघन करण्या-यांवर कारवाई करण्याचे अधिकारी द्यावेत असा आदेश दोन वर्षापुर्वी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी त्यानुषंगाने कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत वा शासन स्तरावरील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०४-२०१५) :** (१) तडजोड शुल्क स्विकारुन गुन्हा निकाली काढण्याचे अधिकार पोलीस शिपायांना देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.१८/२०१० मध्ये दिनांक २८.१०.२०१४ रोजी आदेश दिले आहेत.

(२) मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांना व ठाणे, पुणे नवी मुंबई, नागपूर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस नाईक यांना जागेवर तडजोड शुल्क स्विकारुन गुन्हा निकाली काढण्याचे अधिकार देण्याबाबतची अधिसूचना दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

---

**लातूर जिल्ह्यातील उदगीर वाढवणा (बु) ठिकाणी असलेले पोलिस**
**कारभार अवघ्या तीसच कर्मचाऱ्यांवर चालू असल्याबाबत**

**(२०) १६६२ (१५-०१-२०१५). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील उदगीर वाढवणा (बु.) ठिकाणी असलेल्या पोलिस स्टेशन अंतर्गत फक्त तीसच कर्मचाऱ्यांवर असल्याची बाब ऑक्टोबर २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलिस स्टेशन अंतर्गत हाळी-हंडरगुळी येथे आटपोस्ट पोलिस स्टेशनची स्थापन करण्यात आली असून वाढवणा (बु.) व हंडरगुळी औटपोस्ट स्टेशन अंतर्गत ३४ गावे असून वाढवणा पोलिस स्टेशन अंतर्गत असलेली लोकसंख्या एक लाख इतकी आहे, तसेच या पोलिस स्टेशनची हद्द जवळपास ३० ते ३५ कि.मी. इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या एक लाख लोकसंख्येच्या सुरक्षेची हमी ३० पोलिस कर्मचाऱ्यांच्या हाती असल्याने हे कार्य जोखमीचे व जबाबदारीचे तसेच तणावाचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध वाहतुक, चोऱ्यांचे प्रमाणात तसेच गुन्हेगारी स्वरुपात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे त्यामुळे सदरहू पोलिस ठाण्यात कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत शासन विचार करणार आहे काय,
(५) असल्यास, किती कालावधीत कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१५) :** (१) लातूर जिल्हयातील पो.स्टे. वाढवणा या ठिकाणी एकूण ३१ पदे मंजूर असून सर्व पदे भरण्यांत आली आहेत.
(२) पो.स्टे. वाढवण अंतर्गत ३४ गावे असून त्यापैकी दुरक्षेत्रा हंडरगुळी अतंर्गत १२ गावे आहेत. तसेच पो.स्टे वाढवणा पासुन इतर पो.स्टे. ची हद्द १५ कि.मी चे आत आहे.
(३) वाढवणा पो.स्टे अंतर्गत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नी, महत्वाचे बंदोबस्त महत्वाचे गंभीर गुन्हे घडल्यास जिल्हयातील व पोलीस मुख्यालय येथील अधिकारी/कर्मचारी मदतीसाठी पाठवले जातात. तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे कामाचा ताण कमी व्हावा यासाठी आठवडयातून एक दिवस साप्ताहीक सुट्टी दिली जाते, तसेच इतर रजा ही गुणवत्तेनुसार व आयश्यकतेनुसार मंजुर केल्या जातात. जोखमीच्या चांगल्या कामगिरीसाठी शासनाच्या तरतुदी प्रमाणे बक्षिस ही मंजुर केली जाते, त्यामुळे तणावाचे वातावरण नाही.
(४) व (५) पो.स्टे वाढवणा व दुरक्षेत्र हंडरगुळी येथील सन २०१३ चे तुलनेत सन २०१४ मध्ये चोऱ्यासह गंभीर गुन्ह्यामध्ये घट झालेली आहे. संख्याबळ वाढवण्याचा प्रस्ताव सद्या विचाराधीन नाही.

---

**राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीच्या प्रश्नाबाबत**

**(२१) १६७६ (२२-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर), श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न मागील ४३ वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रंथालय कर्मचा-यांच्या प्रश्नासंदर्भात राज्य ग्रंथालय संघ व विभागीय व जिल्हा स्तरावरून सतत मोर्चे, निवेदने, चर्चा, आंदोलन, धरणे, उपोषण करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी बाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रश्न राज्य ग्रंथालय संघ, विभागीय व जिल्हा स्तरावरुन सादर करण्यात येत असतात.
(३) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी देता येणे शक्य नसल्याचे वेळोवेळी

शासनाने विधीमंडळ सभागृहामध्ये व कार्यकर्त्यासमोरही स्पष्ट केलेले आहे. तथापि, त्यांच्या मानधनात वाढ होण्याच्यादृष्टीने शासन निर्णय दि.२१.२.२०१२ अन्वये, राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिक्षणात अनुदानात दि.१.४.२०१२ पासून ५०% वाढ करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील डीटीएड अध्यापक विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबत**

**(२२) १६७७ (२२-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डीटीएड विद्यार्थ्यांची संख्या सन २००४ मध्ये ३२५ होती ती सन २०१२-१३ मध्ये वाढून १४०५ पर्यत पोहचली आहे, यापैकी एनसीईटीने सन २००८ मध्ये मान्यता दिलेल्या २९१ नव्या अध्यापक विद्यार्थ्यांची नागपूर खंडपिठाने मान्यता रद्द केल्यानंतर संस्थाचालक सर्वोच्च न्यायालयात गेले त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने या अध्यापक विद्यार्थ्यांच्या तपासणीचे आदेश दिले, तपासणीनंतर २८१ पैकी केवळ ४४ विद्यार्थी निकषांची पूर्तता करत असल्याचे स्पष्ट झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरीत विद्यार्थ्यांची तपासणीचे काय झाले, सध्या राज्यात डीटीएड अधिकृत विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, गरजेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मान्यता दिल्यामुळे जागा कमी व शिक्षक जास्त अशी स्थिती निर्माण झाली आहे, याबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१५) :** (१) नाही. प्रश्नामध्ये विद्यार्थ्यांची संख्या असे नमूद केले आहे. तथापि, ती अध्यापक विद्यालयांची आहे. डी.एड कॉलेजची तपासणी करुन गरजेपेक्षा अधिक अध्यापक विद्यालयांना मान्यता मिळाल्याने शासनाने नवीन अध्यापक विद्यालयांना संलग्नता न देण्याची भूमिका घेतलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विदर्भातील धरणांमध्ये गाळ साठण्याचे प्रमाण अधिक असल्याबाबत**

**(२३) १७०६ (२३-१२-२०१४). श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भातील धरणांमध्ये गाळ साठण्याचे प्रमाण दिवसेंदिवस अधिक होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा साठणाऱ्या गाळामुळे धरणातील उपयुक्त पाणीसाठा दरवर्षी कमी कमी

होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणातील साचलेला गाळ उपसून, पाणीसाठा वाढविण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करण्यार आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापी, उपाययोजना केली नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०३-२०१५) :** (१) होय.

(२) धरण बांधल्यानंतर त्यामध्ये कालमानानुसार गाळ साठणे ही नैसर्गिक प्रक्रिया असुन त्यामुळे पाणी साठा कमी होणे स्वाभाविक आहे. विदर्भातील ३२ प्रकल्पांवर दुर संवेदन तंत्राने केलेल्या गाळ सर्वेक्षणानुसार उपयुक्त पाणीसाठ्यातील गाळसाठ्याचे प्रमाण सरासरी ८.०८% असून त्याप्रमाणात पाणीसाठ्यात घट झाली आहे.

(३) व (४) सद्यस्थितीत धरणातील गाळ उपसणे हे आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य आहे. मात्र पाटबंधारे प्रकल्पातून गाळ मिश्रीत वाळू/रेती निष्कासना करिता राज्यातील एका मोठ्या प्रकल्पाची निवड करुन त्या प्रकल्पातील गाळ काढण्याबाबतचा अनुभव विचारात घेऊन राज्यातील इतर प्रकल्पातून गाळ मिश्रीत वाळू/रेती निष्कासनाबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल असा निर्णय शासन महसुल व वन विभाग निर्णय क्र. गौखनि/१०/प्रक्र ४० ख दिनांक ९.९.२०१४ अन्वये घेतलेला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

या व्यतिरिक्त माल गुजारी तलावातील गाळ काढण्याचे काम विभागातंर्गत यांत्रिकी संघटनेमार्फत हाती घेण्यात आले आहे.

---

### राज्यातील सुमारे ७० हजार नगरपरिषद कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत

**(२४) १७६५ (२३-१२-२०१४). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषदेमधील कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-याप्रमाणे १०० टक्के वेतन राज्य शासनाने द्यावे, सर्व रोजंदारी व कंत्राटी कर्मचा-यांना सेवेत विनाअट कायम करण्यात यावे आदी मागण्यासाठी राज्यातील सुमारे ७० हजार नगरपरिषद कर्मचारी दि. १५ जुलै, २०१४ पासून बेमुदत संपावर गेले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत नगरविकास राज्यमंत्री यांच्या समवते दि. १७ जुलै, २०१४ रोजी झालेल्या सकारात्मक चर्चेच्या अनुषंगाने मागण्यांबाबत कोणता निर्णय घेण्यात आला,

(३) अद्याप याबाबत कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्या संबंधीची कारणे कोणती,

(४) शासनाने घेतलेल्या सकारात्मक चर्चेच्या अनुषंगाने याबाबत योग्य तो निर्णय केव्हापर्यन्त अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१५) :** (१) नगर परिषद कर्मचा-यांनी दि.१५.०७.२०१४ पासून

संप पुकारला होता. त्यावेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन आकृतीबंधानुसार ३२,९३७ कर्मचारी कार्यरत होते. संप कालावधीत सरासरी ५८% कर्मचारी संपावर होते म्हणजेच सुमारे १९,१०४ कर्मचारी संपावर होते.

(२) सदर मागणीस अनुसरुन नगर परिषद/नगर पंचायत आस्थापनेवरील कर्मचा-यांचे वेतन व नियमित निवृत्ती वेतनासाठी १००% नगरपालिका सहायक अनुदानाची रक्कम काही अटींवर उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सायन (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या सायन रुग्णालयातील डॉक्टरांच्या वसतिगृहातील छताचा कांही भाग कोसळून झालेली घटना**

**(२५) १८०६ (२३-१२-२०१४). श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या सायन रुग्णालयातील डॉक्टरांच्या वसतिगृहातील छताचा कांही भाग कोसळून एक डॉक्टर किरकोळ जखमी झाल्याची घटना दिनांक २ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृह ३० ते ४० वर्षापूर्वीचे असल्याने वसतिगृहाच्या ओल्या भिंती, कमकुवत छत, अपुरी स्वच्छतागृह व कोंदड वातावरण आहे तसेच या रुग्णालयातील वसतिगृहापैकी एक वसतिगृह हे चाळवजा बैठ्या खोल्या असलेले असून या जुन्या बॅरॅकमध्ये सध्या तीन निवासी डॉक्टर वास्तव्यास आहे या सर्व वसतिगृहाची दूरवस्था असून यात वास्तव करणारे डॉक्टर हे जीव धोक्यात घालून तेथे राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त वसतिगृहाची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१५) :** (१) हे खरे आहे. दिनांक १ सप्टेंबर, २०१४ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे टि-१ बराकीजवळ असलेल्या पिंपळाच्या झाडाच्या फांद्या टि-१ बराकीतील खोली क्र.२ वर कोसळल्या. त्यामुळे खोली क्र.२ च्या छताचा काही भाग खोलीत कोसळल्यामुळे त्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या निवासी डॉक्टरास किरकोळ दुखापत झाली. सदर निवासी डॉक्टरवर त्वरीत उपचार करण्यात आले.

(२) व (३) लोकमान्य टिळक रुग्णालयातील आवारात जुन्या बराकी आहेत. सदर बराकीमध्ये वैद्यकीय विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, पॅरामेडीकल स्टाफ यांचे वास्तव्य आहे. जुन्या बराकीमध्ये वैद्यकीय विद्यार्थी रहात असलेल्या खोल्यांमध्ये उजेड व हवा खेळती ठेवण्याचा महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक रुग्णालय प्रशासनाने प्रयत्न केला आहे. तसेच

शौचालयाची पुरेशी व्यवस्था आहे. नवीन बाह्य रुग्ण इमारतीच्या चौथ्या व पाचव्या मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात आली आहे अलीकडेच वाढीव जागेच्या मागणीनुसार नवीन निवासी वैद्यकीय वसतिगृह इमारतींवर दोन अधिक मजले बांधून घेण्यात आले आहेत. जुन्या बराकीतील सर्व बराकींची संरचनात्मक दुरुस्ती करण्यासंबंधी प्रक्रिया सुरु असून, चाळवजा बैठ्या खोल्यांचे संरचनात्मक परीक्षण करण्यात आले आहे. सदर परीक्षणानंतर सल्लागारांने सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत असून तद्नंतर निविदा मागवून काम सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंबोली, नवी मुंबई द्रुतगती महामार्गावर अनधिकृतरित्या वाहने उभी करण्यात येत असल्याबाबत**

**(२६) १८३२ (२३-१२-२०१४). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंबोली, नवी मुंबई द्रुतगती महामार्गाच्या प्रवेशद्वारावर प्रवासी आपला जीव धोक्यात घालून वाहनांची वाट पाहत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा तया सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कळंबोली येथून द्रुतगती महामार्गाला सुरूवात होत असून पुणे व इतर जिल्ह्यात जाण्यास जलगतीचा मार्ग म्हणून अनेक वाहने याच मार्गाचा वापर करतात त्यामुळे पनवेल, नवीन पनवेल, कामोठा या पसिरातील प्रवासी पुणे आणि घाटमाथ्यावर जाण्याकरिता कळंबोली येथे येऊन वाहने पकडतात मॅकडोनाल्डसमोर अनधिकृतपणे वाहने उभे करून वाहनचालक प्रवाशाचा जीव धोक्यात घालत आहेत हे पाहत शासन त्वरीत याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१५) :** (१) कळंबोली नवी मुंबई द्रुतगती महामार्गाच्या प्रवेशद्वारावर प्रवाशी वाहनांची वाट पाहत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ या महिन्यात निदर्शनास आले आहे.
(२) कळंबोली, मॅक्डोनाल्ड येथे रेस्टारंटच्या समोर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा बस थांबा आहे. तेथूनच पुणे व इतर ठिकाणी जाणाऱ्या गाड्या थांबतात. या ठिकाणी पार्किंग न करण्याबाबत दि.१९.११.२०१४ रोजी अधिसूचना काढण्यात आली असून, तेथे नो-पार्किंगचा फलक लावण्यात आला आहे. अधिसूचनेचा भंग करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याकरिता या ठिकाणी दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. अधिसूचना काढल्यापासून दि.१५.१.२०१५ पर्यंत एकूण ५२७ वाहनांवर कारवाई करुन रु.५२,७००/- दंड वसूल करण्यात आला आहे.

कळंबोली येथे ज्या ठिकाणी द्रुतगती मार्ग सुरु होतो. त्या ठिकाणी वाहने व प्रवासी थांबू

नयेत अशा आशयाचा मोठा फलक लावण्यात आलेला असून, तेथे प्रवासी व वाहने थांबू नयेत याकरिता दोन पोलीस कर्मचारी नेमण्यात येत असून प्रवासी गाड्या थांबणार नाहीत याची खबरदारी घेतली जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईत डान्स बार सुरु असल्याबाबत**

**(२७) १८३४ (१५-०१-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने नऊ वर्षापूर्वी डान्स बारवर बंदी घातली असूनही सर्रासपणे वेटरच्या नावाखाली उभ्या राहणाऱ्या डान्स बार मुलींवर दौलतजादा करण्यात येत असून नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील नटराज नावाच्या ऑर्केस्ट्रा बारमध्ये मुलींवर उडविण्यात येणारे पैसे जमा करण्यासाठी प्लॅस्टिकचे सूप आणि झाडूंचा वापर करावा लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१५) :** (१) व (२) नाही.

नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील पहिल्या मजल्यावर शुभम पॅलेस हे हॉटेल नटराज बार ॲन्ड रेस्टॉरंट म्हणून चालविले जाते. सदर बारमध्ये महिला वेटर काम करिता नाही. गिऱ्हाईकांना मद्य देण्यासाठी पुरुष वेटर व सुपरवायझर यांनी नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर बारमध्ये ऑर्केस्ट्रा चालविण्यासाठी परवाना दिलेल्या आहे.

सदर बारची पोलीसांमार्फत वारंवार तपासणी करण्यात येते. गायक व गायिका यांना आस्थापनेने ओळखपत्रे दिलेली असून गायक व गायिका यांची नोंद स्वतंत्रपणे घेतली जाते. त्याप्रमाणे रजिस्टरमध्ये पडताळणी केल्याबाबत पोलीसांकडून नोंदी केल्या जातात. तसेच सदर बारमध्ये बेकायदेशीर व अनैतिक कृत्य चालत नाहीत याची देखील खातरजमा करण्यात येते.

सदर ठिकाणी बेकायदेशीर व अनैतिक कृत्य चालू नसल्याबाबत व उपस्थित असलेले गिऱ्हाईक हे गायक व गायिकांवर पैसे उधळत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच बारमध्ये मुलींवर पैसे उडविण्यात येतात व ते पेसे गोळा करण्यासाठी प्लास्टिकचे सुप व झाडुचा वापर केला जातो ही बाब खरी नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महापालिका हद्दीतील प्रा.आ.केंद्रे महापालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत**

**(२८) १८४८ (२२-१२-२०१४). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे १६ लाख लोकवस्तीसाठी आरोग्य सेवा पुरविण्याकरीता विरार येथील ग्रामीण रुग्णालय लोकसंख्येच्या व आरोग्यसेवेच्या मानांकनानुसार अत्यंत अपूरे पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालय संबंधित जमिनीसह वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्यास तिथे अद्ययावत व सुसज्ज असे मोठे रुग्णालय स्वखर्चाने बांधण्याचा प्रस्ताव वसई-विरार शहर महानगरपालिकेने शासनाकडे ५ वर्षापूर्वी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनाने अद्यापी मंजूरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर प्रस्ताव किती मुदतीत मंजूर करण्यात येईल अशी अपेक्षा आहे,

(५) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील दिवसेंदिवस वाढीस लागलेली लोकसंख्या व तेथील जनतेला चांगल्या आरोग्यसेवा मिळण्याकरीता सदरहू ठिकाणी लवकरात लवकर सुसज्ज व भव्य रुग्णालय उभारुन कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१५) :** (१) होय

(२) असा कोणताही प्रस्ताव या विभागाकडे प्राप्त झालेला नाही

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

(५) शासनाने शासन निर्णय दि. ०९/०६/२०१४ अन्वये वसई येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता दिली असून त्यानुसार जागा उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

### जळगांव जिल्ह्यातील गिरणा नदीतून पावसाळ्यात लाखो लिटर पाणी वाहून जात असल्याबाबत

**(२९) १८६३ (२३-१२-२०१४). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातून वाहणाऱ्या गिरणा नदीतून पावसाळ्यात लाखो लिटर पाणी वाहून जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता चाळीसगांव - भडगांव - पाचोरा - जळगांव तालुक्यातील हद्दीतून जाणाऱ्या नदीपात्रावर काही बंधारे अथवा केटीवेअर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) या प्रस्तावावर निर्णय घेतला असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) गिरणा उप खो-यात उक्त प्रश्नात नमूद केलेल्या तालुक्यात मेहूणबारे, बहाळ ता.चाळीसगांव, पांढरद, भडगांव ता.भडगांव, परधाडे, कुरंगी ता.पाचोरा व कानळदा ता.जळगांव या ठिकाणी ७ बंधारे घेण्याचे विचाराधीन आहे.
(४) सर्वेक्षण अन्वेषण पूर्ण करुन योजना आर्थिक मापदंडात बसत असल्यास, योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवालाची प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.

---

## राज्यातील वाढते औद्योगिकरण, शहरीकरण व लोकसंख्या लक्षात घेता नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत

**(३०) १८७४ (१५-०१-२०१५). श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाढते औद्योगिकरण, शहरीकरण व लोकसंख्या लक्षात घेता तसेच सातत्याने वाढत असलेल्या गुन्हेगारीला चाप बसविण्यासाठी येत्या काळात राज्यात १२० नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी १४ ठाण्याच्या जागाही निश्चित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त १२० पोलीस ठाणे कोणकोणत्या ठिकाणी उघडण्यात येणार आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) (२) व (३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे अधीनस्त पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यात ६३ नवीन पोलीस ठाणी यांसह विविध संवर्गातील १०५४३ पदे निर्माण करण्यात आली आहेत. उर्वरीत ५९ पोलीस ठाणी पुढील टप्प्यात निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

---

## पालघर जिल्ह्यामध्ये कायमस्वरूपी गटशिक्षणाधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत

**(३१) १९३३ (२२-१२-२०१४). श्री. विलास तरे (बोईसर), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर (जि.पालघर) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ४२३ प्राथमिक शाळा तर माध्यमिकच्या खाजगी अनुदानित, विनाअनुदानित ११४ विद्यालय, १५ आश्रमशाळा तर, केंद्रीय ७ विद्यालय असून तालुक्यात एकूण दिड लाखाहून जास्त विद्यार्थी शिक्षण घेत

असतानाही मागील १५ वर्षांपासून पालघर पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे काम प्रभारी पदानेच चालविले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षण विभागातील शिक्षक बदल्यांसह सर्वच कारभाराची सखोल चौकशी करून अधिका-यांसह संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी व पालकवर्गाने केलेली असून वारंवार होणाऱ्या बदल्यांच्या संदर्भात ग्रामस्थांनी आंदोलने करून अनेक वेळा शाळा बंद ठेवण्याचे प्रकारे घडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) पालघर शिक्षण विभागात प्रभारी ऐवजी कायमस्वरुपी गटशिक्षणाधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०४-२०१५) :** (१), (२) व (३)

होय, हे खरे आहे.

(४) शिक्षकांच्या बदलीतील गैरकारभारासाठी प्रभारी गटशिक्षणाधिका-यास निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. तसेच तत्कालीन गटशिक्षणाधिकारी यांची देखील विभागीय चौकशी सुरु आहे.

(५) व (६) सदर रिक्त पदे सरळसेवेने, पदोन्नतीने व मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील केज-कळंब कुसळंब या राज्य महामार्गावरील दुरुस्तीबाबत

**(३२) १९४८ (२२-१२-२०१४). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील केज-कळंब कुसळंब या राज्य महामार्गावरुन गोवा ते नागपूर जाणारी जडवाहने जात असल्याने रस्तयाची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०३-२०१५) :** (१) प्रश्नाधीन रस्त्यावरुन जड वाहनांची वाहतूक मोठ्या

प्रमाणात होत असल्याने रस्ता खराब होतो. तथापि, विविध योजनेतून रस्त्याची दुरुस्ती करुन रस्ता खड्डे विरहीत करण्यात येवून वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आश्रमशाळांचे कार्यरत शिक्षक कर्मचा-यांसाठी शाळा संहितेचे सुधारित प्रारुप पुनर्विलोकन करण्याबाबत

**(३३) १९५० (२२-१२-२०१४). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळांचे कार्यरत शिक्षक कर्मचा-यांसाठी शाळा संहितेचे सुधारित प्रारुप पुनर्विलोकन करण्याकरिता नियुक्ती केलेल्या समितीचा अहवालावरील छाननींचे काम पूर्ण झाले आहे काय,
(२) असल्यास, त्याचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०४-२०१५) :** (१) व (२) होय, सद्यस्थितीमध्ये खाजगी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या आश्रमशाळा संहितेचे काम पूर्ण करुन मसुदा अंतिम करण्यात येत आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.

---

## सामुहिक प्रोत्साहन योजना २००१ अंतर्गत विद्‌यूत जोडणीस विलंब झाल्याबाबत

**(३४) १९७७ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी येथील प्राईड इंडिया - ऑप टेक्सपार्क मधील उद्‌योग घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजना २००१ अंतर्गत विद्‌यूत जोडणीस विलंब झाल्यामुळे प्रोत्साहनासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उद्‌योग घटक अडचणीत येवून बंद होण्याच्या स्थितीत असल्यामुळे विद्‌यूत घटकाने विशेष बाब म्हणून प्रोत्साहन देण्याची विनंती शासनास केली आहे व सदरील प्रस्ताव मंत्रीमंडळ उपसमिती समोर विचारार्थ प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बँकेकडून जप्तीची कारवाई करणेत येत असल्यामुळे सदरील निर्णयक केंव्हा पर्यत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) नाही. सामुहिक प्रोत्साहन योजना २००१ नुसार

विद्युत वितरण कंपनी मर्यादित, इचलकरंजी यांचेकडून टेक्सटाईल पार्क, इचलकरंजी मधील विद्युत जोडणीसाठी मंजुरी फेब्रुवारी, २००२ मध्ये देण्यात आली होती. परंतु ग्राहकांनी डिमांड नोटचा भरणा मार्च, २००९ मध्ये केला होता व त्यानंतर महावितरण मार्फत ग्राहकांना विद्युत मीटर एप्रिल २००९ मध्ये देण्यात आले असल्यामुळे वीज जोडणीस महावितरण कंपनीकडून विलंब झालेला नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धरणगांव येथे बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शासनामार्फत निधी देण्यासाठी टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत**

**(३५) २०४८ (१५-०१-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगांव येथे बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचे जन्मगांवी त्यांचे भव्यस्मारक उभारण्यासाठी शासनामार्फत निधी देण्यासाठी टाळाटाळ करण्यात येत आहे काय,

(२) असल्यास, निधी न देण्याची कारणे काय आहेत व शासन केव्हापर्यंत सदर स्मारकांसाठी निधी उपलब्ध करुन देणार आहे,

(३) नसल्यास, सदर निधी देण्यात विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) ग्रामीण भागात स्मारके उभारण्याकरिता / दुरुस्तीकरीता या विभागाकडे कोणतेही लेखाशिर्ष उपलब्ध नाही किंवा त्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. या विभागाकडे ग्रामीण क्षेत्रात स्मारके उभारण्यास परवानगी देण्यासाठी / दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याकरिता लोकप्रतिनिधी / विविध संस्था यांच्याकडून विविध प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रपुरुष / थोरव्यक्ती यांची स्मारके उभारण्याबाबत आवश्यक मार्गदर्शक तत्वे विहित करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येत आहे. तद् नंतर प्राप्त विविध प्रस्तावाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता मंत्री मंडळासमोर जाण्याचे प्रस्तावित आहे.

या अनुषंगाने निर्णय होण्यास काही कालावधी लागेल त्यामुळे स्मारके उभारणे / दुरुस्ती करणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आल्यानंतर स्मारकांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करता येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील २३ रुग्णालयांचा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत समावेश करण्याबाबत**

**(३६) २०७५ (२३-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीबातील गरीब रुग्णांना आरोग्याची सुविधा देण्याकरिता शासनाने केशरी व पिवळ्या रेशनकार्ड धारकांना उपचार व शस्त्रक्रिया करणेकरिता राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील २३ रुग्णालयाचा सदर योजनेचा समावेश असून सदर रुग्णालयाची आजपर्यंत १२८०० रुग्णावर उपचार केले असून या उपचाराकरिता जिल्ह्याला ३३ कोटी उपलब्ध झाले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यापैकी २२ कोटी रुपयांची रुग्णालयाची देयके शासनाकडून देण्यात आली असून अद्याप काही रुग्णालयाची जवळ १० कोटी रुपयाची देयके प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयाकडून राजीव गांधी योजनेकडील उपचार केलेल्या देयकांची प्रलंबित बाकी तात्काळ देणेबाबबत शासनाने कोणती कार्यवाही केली किंवा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१४) :** (१) होय, राज्यातील पिवळ्या, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा व केशरी शिधापत्रिकाधारक (रु.एक लक्ष वार्षिक उत्पन्न असलेले) कुटुंबे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे लाभार्थी आहेत.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील १ शासकीय व २७ खाजगी अशा एकूण २८ रुग्णालयांचा समावेश योजनेमध्ये करण्यात आला आहे. आतापर्यत योजनेंतर्गत १३८२९ रुग्णांवर शस्त्रक्रिया/उपचार करण्यात आले असून त्याची रक्कम रु. ३९.३९ कोटी इतकी आहे.

(३) नाही, अंगीकृत रुग्णालयांनी विमा कंपनीकडे रु. ३६.३७ कोटीचे दावे सादर केले असून त्यापैकी कंपनीने रु. २९.८८ कोटीचे दावे अदा केले आहेत.

(४) सदर योजनेंतर्गत दावे शासनाकडून अदा करण्यात येत नाही तर विमा कंपनी व रुग्णालये यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील तरतूदीनुसार विमा कंपनीकडून रुग्णालयांना दावे अदा केले जातात. त्यानुसार रुग्णालयांनी दाव्यांसोबत आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्राची ऑनलाईन पूर्तता केल्यानंतर १५ कार्यालयीन दिवसात दावे विमा कंपनीने अदा करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील संतपीठ पुर्ण कार्यक्षमतेने सुरु होण्याबाबत**

**(३७) २०९९ (२२-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील संतपिठाची इमारत बांधून ८ वर्षे झाली असली तरी तेथे नियमितपणे अध्यात्माच्या अभ्यासक्रमास सुरुवात झाली नाही तसेच या इमारतीत सतत विविध शासकीय कार्यक्रम होऊन त्यानिमित्ताने उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून असभ्य, समाजमनाविरुध्द वर्तणूक होत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी शासनाने काय कारवाई केली आहे काय तसेच संतपीठ पुर्ण कार्यक्षमतेने सुरु होण्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(३) प्रत्यक्ष संतपीठ ज्या उद्देशासाठी स्थापन झाली त्याची पुर्तता करण्यासाठी संतपीठ किती कालावधीत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-०३-२०१५) :** (१) व (२) शासनाने औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे संतपीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला त्या अनुषंगाने संतपीठाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम देखील करण्यात आले. दरम्यान संतपीठासह संत ज्ञानेश्वर उद्यानाची जागा पक्षी अभयारण्यासाठी अधिसूचित करण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर क्षेत्र पक्षी अभयारण्यातून वगळण्याबाबत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट होते. शासनाने दि.२८ नोव्हेंबर, २०१३ च्या अधिसूचनेन्वये हे क्षेत्र निरधिसुचीत केले आहे. तद्नंतर फेब्रुवारी २०१४ मध्ये संतपीठाच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले अद्यापर्यंत या वास्तुत कोणतेही शासकीय कार्यक्रम घेण्यात आलेले नाहीत. संतपीठासाठी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र सदर अभ्यासगटाकडून अभ्यासक्रमासंदर्भात कोणताही ठोस प्रस्ताव प्राप्त झाला नाही. त्यामुळे आता स्वतंत्रपणे अन्य कार्यवाही कशा प्रकारे करता येईल याबाबत विचार करण्यात येत आहे. या शिवाय संतपीठासाठी प्रशासकीय यंत्रणा व अन्य व्यवस्थापन विषयक उपाययोजना यांचा प्रस्ताव सादर करण्याचे संचालक, सांस्कृतिक कार्य यांना सुचित करण्यात आले आहे. या कार्यवाहीस काही कालावधी लागणार आहे.

(३) संतपीठाचा अभ्यासक्रम, प्रशासकीय व व्यवस्थापन विषयक अंतिम निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण करुन संतपीठ लवकरात लवकर कार्यान्वीत करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

---

**राज्य शासनाने अनुदान बंद केल्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज दर वाढीस मान्यता दिल्याबाबत**

**(३८) २१०१ (१५-०१-२०१५). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने अनुदान बंद केल्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज दर वाढीस मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य ग्राहकावर वीज दरवाढीचा बोजा पडू नये यासाठी शासनाने कोणती

उपायोजना केली करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) सर्वसामान्य ग्राहकांवर वीजदर वाढीचा बोजा पडू नये यासाठी शासनाने कृषी ग्राहकांना वीजदरात देण्यात येणारी सवलत यापुढेही सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. तसेच औद्योगिक ग्राहकांना अचानकपणे दरवाढीमुळे कठीण परिस्थितीचा सामना करावा लागू नये. म्हणून औद्योगिक ग्राहकांना एक महिन्यांच्या वीज देयकामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील वर्ग २ च्या शेतजमिनी वर्ग १ मध्ये परावर्तीत करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३९) २१२४ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील वर्ग २ च्या शेतजमिनी वर्ग १ मध्ये परावर्तीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पलंबीत आहे काय,
(२) असल्यास, खरेदी विक्रीने मालकी हक्काद्वारे वहीवाटीत असलेल्या शेतक-यांच्या शेतजमीनीचे वर्ग २ मधुन वर्ग १ मध्ये परावर्तन झाल्यामुळे अनेक शेतकरी शसकीय योजनंच्या लाभापासून वंचित झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली व पुर्व विदर्भातील जिल्हयांमधिल अनेक शेतक-यांचे वर्ग २ च्या शेतजमीनीचे वर्ग १ मध्ये होणारे न्यायोजित परावर्तन करण्याकरीता शासनाच्या महाराष्ट्र राज्य जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या विविध कलमांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे कय,
(४) असल्यास, परावर्तनाचा निश्चित कालावधी काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०४-२०१५) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २९ (२) (सी) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (विविक्षित भूमिधारकांना भोगवटदार वर्ग -१ मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवरनगी देण्याबाबत) नियम १९६८ मधील तरतुदीस अनुलक्षून विदर्भातील अनिर्बंधित भूमिधारी (भोगवटदार वर्ग - २) शेतक-यांना भूमिस्वामी (भोगवटदार वर्ग - १) मध्ये परिवर्तित करण्याबाबत शासनाने दि. २ जानेवारी, २०१२ रोजीच्या परिपत्रकान्वये आवश्यक निर्देश यापूर्वीच निर्गमित केले आहेत. त्यानुसार गडचिरोली व विदर्भातील इतर जिल्हयात प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे क्षेत्रिय पातळीवर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राजीव गांधी जिवनदायी योजनेंतर्गत किडणी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नागपूर येथील सूपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये करणेबाबत**

**(४०) २१३२ (२३-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत राज्य शासनाद्वारा किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नागपूरातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये करण्यात येणार आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल मध्ये बंद वा तांत्रिकदृष्ट्या निकामी असलेली उपकरणे बदलून सर्व अद्ययावत सुविधा पुर्ववत सुरु करण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यांतर्गत असलेले जिल्हा सामान्य रूग्णालय व उपजिल्हा सामान्य रूग्णालयांमध्ये प्राथमिक चाचणीकरीता अद्ययावत सुविधांची उपकरणे व त्या करीता लागणाऱ्या तांत्रिक कर्मचा-यांची पदभरती करण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पदभरती व अद्ययावत सुविधेच्या कामाची सद्य :स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नागपूर जिल्ह्यामध्ये जिल्हा रुगणालय नसून दोन उपजिल्हा व एक स्त्री रुग्णालय आहे. सदर रुग्णालयातील प्रयोग शाळा तंत्रज्ञ व क्ष - किरण तंत्रज्ञांची सर्व पदे भरलेली असून सर्व प्रकारच्या प्राथमिक चाचणीकरिता अद्ययावत उपकरणे उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत अंधेरी (प) येथील अनधिकृत ऑटो रिक्षांबाबत**

**(४१) २१४३ (१५-०१-२०१५). श्री. अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पश्चिम येथ व्ही.पी रोड वरील अनाधिकृत ऑटो रिक्षांबाबाबत तक्रार गेले अडीच वर्षापासून अंधेरी आर.टी.ओ. व डी.एन. नगर वाहतूक विभागास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात सदर परिसरामध्ये किती अनाधिकृत ऑटो रिक्षा जप्त केल्या आहेत,

(३) सदर परिसर अनधिकृत ऑटो रिक्षांपासून मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०४-२०१५) :** (१) यासंदर्भात प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) या कार्यालयाकडे लोकप्रतिनिधीकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) यांचे कार्यक्षेत्रात त्यांचे भरारी पथकामार्फत तसेच वाहतूक पोलीस विभाग, डी.एन.नगर शाखा यांचे सहकार्याने

व्ही.पी.रोड/जे.पी.रोड येथे माहे नोव्हेंबर, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत ऑटोरिक्षा विरुध्द विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली सदर तपासणीत ५४७ ऑटोरिक्षा तपासण्यात येऊन दोषी आढळून आलेल्या १६८ रिक्षा चालकाकडून रु. १४,१००/- इतका दंड वसूल करण्यात आला व २९ रिक्षा जप्त करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राधानगरी तालुक्यातील वाकीघोल परिसरातील कामतेवाडी व बागल प्रकल्पांना वन विभागाच्या वन्य जीव विभागाने अडथळे आणल्याबाबत

**(४२) २१६२ (२२-१२-२०१४). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी तालुक्यातील वाकीघोल परिसरातील कामतेवाडी व बागल प्रकल्पांना वन विभागाच्या वन्य जीव विभागाने अडथळे आणले असून सदरचे अडथळे दूर करण्यासाठी शासनाचे धोरण काय आहे

(२) असल्यास, उक्त प्रकल्प रखडल्यामुळे पाण्याची टंचाई होत असून याबाबत वन्य जीव विभागाला तातडीने सूचना देण्यासंदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) राधानगरी अभयारण्यातील सावर्दे (कामतेवाडी) लघुपाटबंधारे प्रकल्पास केंद्र शासनाकडून मंजूरी मिळविण्याची कार्यवाही पाटबंधारे विभाग व वन विभागाकडून सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील अनुदानित शाळांना अनुदान मिळण्याबाबत

**(४३) २१८७ (२२-१२-२०१४). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शेकडो अनुदानित शाळा शिक्षण हक्क कायद्यातील सर्व शिफारसी आणि तरतूदी पुर्ण करुन अनुदानास पात्र ठरलेल्या असूनसुध्दा अनुदानासाठी प्रतिक्षा करावी लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २००० वा त्यापूर्वी सुरु करण्यात आलेल्या प्रादेशिक भाषेतील शाळांना दिनांक १९ नोव्हेंबर, २००१ रोजीच्या आदेशानुसार शासनाकडे निधी नाही म्हणून कायम विनाअनुदानित तत्वावर परवानगी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभागाने ४०० प्राथमिक व ५७ माध्यमिक शाळांना दिनांक २ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अध्यादेशानुसार शाळा अनुदानास निकषात पात्र म्हणून जाहीर केले या शाळांना माहे जून, २०१२ पासून अनुदान लागू करण्यात आले मात्र अद्याप यावर वित्त विभागाने निर्णय न घेतल्याने त्यांचे अनुदान प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या शाळा अनुदानास पात्र ठरल्या आहेत त्यांना यावर्षी अनुदान प्राप्त होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्याची वित्तीय स्थिती विचारात घेऊन शासनाने खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी देण्याचा निर्णय तत्कालीन परिस्थितीत घेतला.
(३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक २५/६/२०१३ पर्यंत अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना दिनांक १८ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये वेतन अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

---

**आरमोरी तालुक्यातील बोळ्या व तलावांचे खोलीकरण करण्याबाबत**

**(४४) २२१७ (२२-१२-२०१४). श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील सर्व बोळया व तलावांचे शेतीच्या सिंचनाकरीता खोलीकरण व मजबुतीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सदर क्षेत्रातील शेतक-यांनी सदर बोळया व तलावाचे खोलीकरण करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत अद्याप कोणतीही उचीत कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे कय,
(४) नसल्यास, उक्त कार्यवाही किती मुदतीत पुर्ण केल्या जाईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०३-२०१५) :** (१) नाही.
तथापि, आरमोरी तालुक्यात २९८ माजी मालगुजारी तलाव, १ गांव तलाव व ल.पा. तलाव असे एकुण ३०१ तलाव आहेत. त्यापैकी ७६ तलावांना खोलीकरण व मजबुतीकरण करणे आवश्यक आहे.
(२) व (३) नाही.
(४) उपरोक्त ७६ मा.मा. तलावांचे गेट दुरुस्ती, पाळ दुरुस्ती, गाळ काढण्याचे काम विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम (VIDP) मध्ये करण्याचे प्रस्तावीत असुन निधी उपलब्धतेनुसार सदर कामे मार्च, २०१६ पर्यंत पुर्ण करण्यात येतील.

---

**मौजे घाटीवळे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४५) २२२५ (२२-१२-२०१४). श्री. सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे घाटीवळे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या १००० लोकसंख्या असलेल्या गावातील ग्रामस्थांना सर्दी, ताप तसेच विंचू, सर्प यांनी दंश केल्यास उपचारासाठी आजू बाजूच्या

परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्यामुळे अनेक वर्षापासून ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी आरोग्य केंद्र सुरु करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही अशा आशयाचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) मौजे घाटीवळे म्हणजेच घाटीवळे (बु) व घाटीवळे (खुर्द) अशी दोन गावे असून सदर गावे करजारी उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र देवळे अंतर्गत आहेत.
दि.१.४.१४ ते ३१.१२.१४ या कालावधीतील मौजे घाटीवळे (बु) येथील २ सर्पदंश,
२ विंचूदंश रुग्णांना देवळे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार देण्यात आले. मौजे घाटीवळे (खुर्द) येथे सर्पदंश व विंचूदंशचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नशिराबाद ( ता.जि.जळगाव) येथून जवळच असलेल्या शेळगाव बॅरेजमध्ये दोन तरूणांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४६) २३०३ (२२-१२-२०१४). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नशिराबाद (ता.जि.जळगाव) येथून जवळच असलेल्या शेळगाव बॅरेजमध्ये दिनांक ४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दोन तरुणांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नशिराबाद पोलीस स्थानकात नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मृतांच्या नातेवाईकांना कोणत्या स्वरुपाची मदत देण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर घटनेबाबत नशिराबाद पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यू रजि. नं. ३६/२०१४ सी.आर.पी.सी १७४ अन्वये अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आलेला असून तपास पुर्ण करण्यात येवून समरी मंजूरीसाठी अहवाल पाठविणेत आलेला आहे.
(३) सदर घटनेतील मयताचे नातेवाईकांना अद्‌याप पर्यंत कोणत्याही स्वरुपाची आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

---

**राज्यातील आयुर्वेद महाविद्‌यालयातील कर्मचाऱ्यांना उपदान व ग्रॅज्युएटी वेतन योजना लागू करण्याबाबत**

**(४७) २३६५ (२२-१२-२०१४). श्री. संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयुर्वेद महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना उपदान व ग्रॅज्युएटी वेतन योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०३-२०१५) :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचा दिनांक १०.०६.२०१३ च्या न्याय निर्णय व त्याबाबत दाखल केलेली अवमान याचिकेच्या अनुषंगाने मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शासन अनुदानीत १) विदर्भ आयुर्वेद महा. अमरावती २) श्री.आयुर्वेद महाविद्यालय नागपूर ३) डा.मा.म.आयुर्वेद महाविद्यालय यवतमाळ ४) श्रीगुरुदेव आयुवेद महाविद्यालय, मोझरी व संलग्नित रुग्णालये या चार याचीकादार संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्याबाबत शासनाने दि. १७.०१.२०१५ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायलय, नवी दिल्ली येथे दाखल केलेली पुनर्विलोकन याचिका (Review Petition) न्यायप्रविष्ठ आहे.

तथापि, हे कर्मचारी शासनाचे कर्मचारी नसून संस्थेचे कर्मचारी असल्यामुळे, शासन अनुदानीत आयुर्वेद/युनानी वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये येथिल कर्मचा-यांना शासनाचा महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ लागू नाहीत.

---

### अंधेरी पोलीस ठाणे व एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या एक वर्षापासून सोनसाखळी चोरी व घरफोडीसारख्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याबाबत

**(४८) २३६६ (२२-१२-२०१४). श्री. रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पोलीस ठाणे व एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या एक वर्षापासून सोनसाखळी चोरी व घरफोडीसारख्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर गुन्ह्याचा तपास करण्यास पोलीस यंत्रणा कुचकामी ठरल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) सदर घटनांमुळे पोलीस यंत्रणा व शासनाविरुध्द सर्वसामान्य जनतेमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून चोरीस गेलेला माल परत मिळू शकेल की नाही याबाबत पोलीसांवर सामान्य जनतेचा विश्वास उरला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१५) :** (१) अंधेरी पोलीस ठाणे व एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत सन २०१३ मध्ये सोनसाखळी चोरीच्या दाखल ६५ गुन्ह्यांपैकी १५ गुन्हे उघडकीस आले आहेत तर घरफोडीच्या दाखल १०० गुन्ह्यांपैकी ३० गुन्हे उघडकीस आले आहेत.

तर सन २०१४ मध्ये सोनसाखळी चोरीचे ५८ दाखल गुन्ह्यांपैकी २५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तर घरफोडीच्या दाखल ११२ गुन्ह्यांपैकी ३१ गुन्हे उघडकीस आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पोलीस यंत्रणा व शासन नोंद झालेले गुन्हे उघडकीस आणण्यासाठी आपल्या परीने सर्वोतोपरी प्रयत्न करीत असतात तसेच दाखल झालेल्या गुन्ह्यांचे फिर्यादी यांना झालेल्या तपासाबाबत वरचेवर माहिती देत असतात. तसेच एखाद्या गुन्ह्यात मालमत्ता हस्तगत झाल्यास त्याबाबत फिर्यादी यांना मालमत्ता परत मिळण्याबाबत मा.न्यायालयाकडून आदेश प्राप्त करण्याबाबत सांगण्यात येते.

त्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये तीव्र संताप निर्माण होवून त्यांच्याकडून मोर्चा काढणे, आंदोलन करणे, रास्ता रोको करणे अशा प्रकारची एक ही घटना अंधेरी व एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झालेली नाही. त्यामुळे सामान्या जनतेचा अजूनही पोलीसावर विश्वास असल्याचे दिसून येते.

(४) सोनसाखळी चोरी व घरफोडी यासारखे गुन्हे हे सराईत गुन्हेगार करीत असल्याने पोलीसांमार्फत वरचेवर सराईत गुन्हेगाराची घरे तपासली जातात. वारंवार घडणा-या गुन्ह्याच्या ठिकाणी सापळे लावले जातात.

बृहन्मुंबईमध्ये जेलमधून सुटलेल्या आरोपीवर निगराणी ठेवली जाते तसेच बृहन्मुंबईमध्ये अशा प्रकारच्या गुन्ह्यात अटक झालेल्या आरोपीचा ताबा घेवून त्यांचेकडे तपास केला जातो. वारंवार नाकाबंदी, कौंबिग ऑपरेशन करुन गुन्ह्यांना आळा घालण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील अरुंद रस्ते व रस्त्यामधील अडथळे दूर करण्याबाबत**

**(४९) २३६७ (२३-१२-२०१४). श्री. रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील अरुंद रस्ते व रस्त्यामधील अडथळे दूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी वेळोवेळी मागणी करुनही महापालिका प्रशासनाने गेल्या पंधरा वर्षात के/पूर्व विभागातील रस्ते रुंद न केल्यामुळे व अडथळे न हटविल्यामुळे वाहतूकीची कोंडी होत असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषतः जिजामाता मार्ग पंपहाऊस सबवे ते कनोसा शाळेपर्यंत महाकाली गुंफा मार्ग अंधेरी-कुर्ला रोड साई पॅलेस हॉटेल ते होली फॅमिली स्कूलपर्यंत, जुना नागरदास मार्ग पानीपत मैदान ते कोळसावाला कंपाऊंड पर्यंत सदर रस्त्यांवर महापालिका प्रशासनाने गेल्या पंधरा वर्षात रस्त्यांमध्ये असलेली बांधकामे दुकाने व घरे यांना वारंवार कागदपत्रे सादर करण्याकरिता पत्र देणे व नव्याने निर्माण झालेल्या एम.आर.टी.पी. कायद्यान्वये नोटिस देणे व परिशिष्ट-२ बनविणे एवढेच कागदोपत्री काम केले असून प्रत्यक्षात रस्ता रुंदीकरणाचे व रस्त्यांवरील अडथळे हटविण्याचे काम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्ते त्वरीत रुंद करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख अभियंता (रस्ते) यांनी प्रस्तावित केलेले विकास नियोजन आरखड्यातील बहुतांश रस्ते उपप्रमुख अभियंता (वाहतुक व समन्वय) यांनी प्रस्तावित केलेल्या रस्ता रेषेनुसार विकसित करण्यात आले आहेत. उर्वरीत रस्ते प्राधान्याने रुंदीकरणाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात येतील.
(२) व (३) जिजामाता रस्ताच्या उत्तर वाहिनीवरील बाधित बांधकामे निष्कासीत करण्यात आली असून रस्ता रेषा अतिक्रमण विरहीत करण्यात आली आहे व दक्षिण वाहिनीवरील कनोसा शाळेपासून ते विजय राऊत रस्त्यापर्यंत बाधित बांधकामे हटविण्यात आली आहेत. विजय राऊत रस्त्यापासून ते पंप हाऊस पर्यंत बाधित बांधकामांना नोटीसा बजावून पात्रता यादी तयार करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. पात्रता यादीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अंधेरी कुर्ला रस्त्यापासून सेंट्रल एमआयडीसी रस्त्यापर्यत १२० फूट रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणा-या बांधकामांची पात्रता यादी एमएमआरडीएने एमयुटीपीनुसार तयार केलेली असून सदर प्रकल्प महानगरपालिकेला २०१० ला हस्तांतरण केलेला आहे. सदर रस्तारेषा अतिक्रमण विरहीत करण्याचे काम एमयुटीपीनुसार करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

जुना नागरदास रोड ते कोळसावाला कंपाऊंड या रस्त्यामध्ये एकूण ८५ बांधकामे बाधित होत असून महाराष्ट्र शासनाच्या १.१.१९९५ पूर्वीच्या झोपड्या संरक्षण पात्र करण्याच्या धोरणानुसार ३८ निवासी व ५ अनिवासी बांधकामे पात्र करण्यात आलेली असून सदर बांधकामांना स्थलांतरण करण्याची कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र शासनाने नुकत्याच पारित केलेल्या १.१.२००० पूर्वीच्या झोपड्यांना संरक्षण पात्र करण्याच्या धोरणानुसार अपात्र झोपडीधारकाकडून पुरावे मागविण्यात आले असून पुराव्यांची छाननी सुरु आहे.

---

**मुंबईतील महाविद्यालयांमधील जिमखान्यांची चौकशी करण्याबाबत**

**(५०) २३८५ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या क्रीडा आणि युवा धोरणाचा आधार घेत मुंबईतील महाविद्यालयांना जिमखाना व क्रीडा शुल्क दुप्पट करण्याची परवानगी मुंबई विद्यापीठाने दिली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णय मोजक्याच महाविद्यालयांचा अपवाद वगळता बहुतांश महाविद्यालयांमधून बुध्दिबळ आणि कॅरम या व्यतिरिक्त खेळाचे कुठलेही साधन किंवा सुविधा पुरविली जात नाही तसेच जिमखाना एखाद्या लहानशा जागेत वसविलेले असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग-२ बाबत शासनाने मुंबईतील महाविद्यालयांतील जिमखान्यांची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ज्या महाविद्यालयांत जिमखान्याविषयी उदासिनता असेल त्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) याबाबत चौकशी करण्यासाठी लवकरच विद्यापीठामार्फत समिती गठीत करुन निर्णय घेण्यात येणार आहे.

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.